क्रमांक : १०४० /क-१,
~~महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,~~
विधान भवन, मुंबई
दिनांक: २ मे, २०२२

:: **परिपत्रक** ::

या सचिवालयातील 'सहायक कक्ष अधिकारी' संवर्गात 'अनुसूचित जमाती' प्रवार्गाकरीता रिक्त असलेली दोन पदे **"मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे"** भरावयाची आहेत. सदरहू परिक्षा स्पर्धात्मक परिक्षा असल्यामुळे उमेदवारांची संख्या कितीही असली तरी, मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरावयाच्या पदांच्या संख्येएवढीच गुणवत्ताक्रमानुसार व आरक्षणानुसार अर्हताप्राप्त उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल.

या सचिवालयात 'अनुसूचित जमाती' प्रवर्गातील सहायक कक्ष अधिकारी पदावर कार्यरत असलेले कर्मचारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील खालील अर्हता व पात्रता धारण करणारे इच्छूक कर्मचारी सदर परिक्षेकरीता आवेदनपत्र भरु इच्छित असल्यास, त्या उमेदवारांनी आपली आवदेनपत्रे सोबत जोडलेल्या नमून्यात शुक्रवार, दिनांक १३ मे, २०२२ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत या सचिवालयास सादर करावीत.

**-:: अर्हता व पात्रता ::-**

१) पदवीधर उमेदवाराच्या बाबतीत त्यांनी लिपिक-टंकलेखक पदाची सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) इतर उमदेवारांच्या बाबतीत त्यांची शुक्रवार, दिनांक १३ मे, २०२२ रोजीपर्यंत लिपिक-टंकलेखक पदावर कमीत-कमी पाच वर्षे नियमित सेवा असणे व लिपिक-टंकलेखक पदाची सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी आवेदनपत्र विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच प्राप्त आवेदनपत्रांची छाननी करण्यात येऊन परिक्षेस पात्र परिक्षार्थी निश्चित करण्यात येतील याची सर्व कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी.

आदेशानुसार,

**( मोहन काकड )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

सर्व संबंधित कर्मचारी

**प्रतिलिपी :-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
२) या सचिवालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी
३) या सचिवालयातील सर्व कक्ष
४) संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**( या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ७४० /क-१, दिनांक २ मे, २०२२ सोबतचे आवेदनपत्र)**

या सचिवालयातील 'सहायक कक्ष अधिकारी' संवर्गात 'अनुसूचित जमाती' प्रवार्गाकरीता रिक्त असलेली दोन पदे **"मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे"** भरावयाची आहेत. सहायक कक्ष अधिकारी पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना उक्त परिक्षेस बसावयाचे आहे, त्यांनी खालील माहिती असलेले आवेदनपत्र शुक्रवार, दिनांक १३ मे, २०२२ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत या सचिवालयास सादर करावीत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे आवेदनपत्र विचारात घेतली जाणार नाहीत.

**:: नमूना ::**

**१) उमेदवाराचे नाव** :-

**२) पदनाम** :-

**३) लिपिक-टंकलेखक पदावर नियमित सेवा सुरु झाल्याचा दिनांक** :-

**४) लिपिक-टंकलेखक पदावरील नियमित सेवेचा कालावधी** :-

**५) शैक्षणिक पात्रता**

**६) लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** :-

**७) प्रवर्ग** :-

**८) जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक** :-

**९) उमेदवाराची स्वाक्षरी** :-